# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ५०–२०१०/ दिनांक :

श्री. संजय आण्णासो चव्हाण,
मु. पो. खंडेराजुरी, ता. मिरज, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
ग्रामीण विभागीय कार्यालय, विश्रामबाग, सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
ग्रामीण उप विभाग क्र. १, मिरज, जि. सांगली — विरूध्द पक्षकार

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. संजय आण्णासो चव्हाण, मु. पो. खंडेराजुरी, ता. मिरज, जि. सांगली या तक्रारदाराने उप विभाग मिरज या वि.प.च्या कार्यालयात दि. १५.१.२०१० रोजी शेतीपंप वापरासाठी वीज जोडणी मिळावी म्हणून अर्ज केलेला आहे. विहित मुदतीत चलन न मिळाल्यामुळे भरपाई रक्कम मिळावी या मागणीसाठी दि. ६.२.२०१० रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सागली यांच्याकडे तक्रार नोंदविलेली आहे. कक्षाने आपला निर्णय दि. ८.२.२०१० रोजी दिला आहे. तथापि पुरेशी वेळेची वाट न बघता ग्राहकाने अर्ज प्रतिनिधीमार्फत मंचाकडे दाखल केला आहे. सदरचा अर्ज मंचात दि. २.३.२०१० रोजी प्राप्त झाला आहे.

मंचात अर्ज प्राप्त होताच मंचाने पुढील कार्यवाहीचा भाग म्हणून दि. २१.३.२०१० पर्यंत मुद्देनिहाय अभिप्राय वि.प.कडून मागविला. वि.प.ने सदरचा अभिप्राय दि. ५.४.२०१० रोजी मंचाकडे पाठविला. मंचाने त्यानंतर दि. २०.४.२०१० रोजी मंच कार्यालयात सुनावणीची तारीख नक्की केली व तसे ग्राहक व वि.प.च्या संबंधितांना नोटीसीने कळविले. सुनावणीच्यावेळी ग्राहकाचे प्रतिनिधी व वि.प.चे अधिकारी उपस्थित होते.

ग्राहक मंचामध्ये तक्रार दाखल होण्याचे प्रमाण जास्त असल्याने तसेच अध्यक्ष व ग्राहक सदस्य यांची पदें सप्टेंबर व ऑक्टोबर २००९ मध्ये रिक्त असल्याने विहित मुदतीत निर्णय देता आला नाही ही वस्तुस्थिती आहे.

वरील प्रकरणी ग्राहकाने दाखल केलेला तक्रार अर्ज, त्यासोबतची कागदपत्रे, वि.प.ने हजर केलेला मुद्देनिहाय अभिप्राय, सुनावणी दरम्यानची कथने, अंतर्गत कक्षाचा निर्णय या सर्व कागदपत्रांची पडताळणी केल्यावर मंच खालील निष्कर्षाप्रत आलेला आहे.

श्री. संजय आण्णासो चव्हाण यांनी दि. ५.१.२०१० रोजी नवीन वीज जोडणीसाठी अर्ज केलेला आहे ही तारीख वि.प.यांना मान्य आहे. तसे वि.प.ने आपल्या मुद्देनिहाय अभिप्रायाच्या पत्रात नमूद केली आहे, ग्राहकानेही त्यासाठी अर्जाची पोहोच प्रत जोडलेली आहे. विहित मुदतीत चलन देणे ही विनियमातील तरतूद असून त्याबर हूकूम वि.प.ने आपले कार्य करणे विनियमास अपेक्षित आहे. असे असतांनाही ग्राहकाने करावयाच्या खर्चासंबंधीचे चलन दि. १९.३.२०१० रोजी वि.प.कडून दिले गेले आहे. अंतर्गत कक्षाचा निर्णय दि. ८.२.२०१० रोजी झाल्याचे वि.प.ने मान्य केले आहे. तसेच ग्राहकानेही त्याची प्रत सोबत जोडली आहे. विहित मुदतीत चलन देण्यात यावे, विलंब झालेस भरपाई द्यावी असा निर्णय अंतर्गत कक्षाने देवूनही १९.३.२०१० पर्यंत विलंब का झाला याचा खुलासा वि.प.ने केलेला नाही. या बाबीची मंचाने नोंद घेतली आहे. तसेच सुनावणीच्या दरम्यान झालेल्या विलंबाबद्दल वि.प.ने दिलगीरी व्यक्त करुन दि. १९.५.२०१० पर्यंत विद्युत जोडणी देवून तसा अहवाल मंचात सादर करण्याचे ऑफीस कनिष्ठ अभियंता श्री. माळी यांनी सांगितले व सहाय्यक अभियंता यांच्या सहीचे पत्र मंचात दाखल केले आहे. तथापि आज न्यायनिर्णय होत असतांना दि. २९.५.२०१० पर्यंत वीज जोडणी दिल्यासंदर्भातील कोणताही कागद मंचास वि.प.कडून प्राप्त झालेला नाही. तसेच विलंबाबद्दल समाधानकारक खुलासा अथवा तसा आयोगाचा आदेश वि.प.ने सादर केलेला नाही, त्याचप्रमाणे ग्राहकाने दाखल केलेल्या मा. लोकपालांच्या वेगवेगळ्या आदेशांतील निर्णयाच्या आधारे असा विलंब माफ करणे उचित नाही असे मंचाचे ठाम मत झाले आहे. मंचाने कांही निर्णयामध्ये उभयबाजूंच्या सहमतीने तसेच प्रतिनिधीच्या संमत्तीने वीज जोडणी ही मूळ मागणी मान्य केल्यास आपणहून भरपाई नको असल्याची ग्राहकाची अर्जाद्वारे विनंती मान्य करुन भरपाई देणे रद्द केले आहे. मात्र या परिस्थितीत मंचाने व ग्राहक प्रतिनिधींनी वि.प.कडे विचारणा करुनही वि.प.कडून सकारात्मक हालचाल न झाल्यामुळे सर्व बाबींचा परामर्श घेवून मंच झालेल्या विलंबाबद्दल भरपाई देण्याचा आदेश देत आहे. संबंधित प्रकरणी दि. ५.१.२०१० रोजी अर्ज आल्याचे नक्की करुन पुढील ३० दिवसांचा कालावधी वितरण वाहिनीच्या विस्तारासाठी गृहीत धरुन दि. ५.१.२०१० ते दि. ४.२.२०१० या कालवधीनंतर म्हणजेच दि. ५.२.२०१० ते दि. १९.३.२०१० या ६ आठवड्यांच्या विलंबासाठी विनियमातील तरतुदीनुसार आठवड्यास किंवा त्याच्या भागास रु. १००/- इतकी भरपाई म्हणजेच रु. ६००/- भरपाई निश्चित करण्यात आली आहे. आदेश खालील प्रमाणे –

## आदेश

१) विनियमातील तरतुदीचा भंग केला म्हणून ६ आठवड्यांच्या विलंबासाठी रु. १००/– या प्रमाणे एकूण रु. ६००/– इतकी भरपाई वि.प.ने ग्राहकास द्यावी.

२) सदर रकमेचे समायोजन दोन बिलींग सायकलमध्ये करण्यात यावे

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. सी. लेले )

सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :